बीड । मंगळवार

१५.०४.२०२५

वर्षे : ५ अंक : १५

किंमत : ३ रू. पाने : ४

दैनिक ● www.marathwadapatra.com

# मराठवाडा पत्र

■ संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ■






dailymarathwadapatra2021@gmail.com RNI:Reg.NO.MAH/MAR/2021/80074 Post:Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-2027 Mob:9822152955 पान:१


# उद्धारली कोटी कुळे भीमा तुझ्या जन्मामुळे




**बीड । प्रतिनिधी**

विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त सोमवार दिनांक १४ एप्रिल रोजी बीड शहरातील विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर चौक परिसरात अभिवादन करण्यात आले यावेळी जिल्हाधिकारी पोलीस अधीक्षक यांची उपस्थिती होती तसेच अभिवादन करण्यासाठी मनोज जरांगे पाटील यांनी सुद्धा विशेष उपस्थिती लावली होती. बीड जिल्ह्यामध्ये डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली या जयंतीची तयारी गेल्या अनेक दिवसापासून सुरू होते काल सकाळपासूनच विविध सामाजिक उपक्रमातून ठीक ठिकाणी हा भीम उत्सव साजरा करण्यात आला डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करण्यासाठी अनेक ठिकाणी खूप मोठ्या प्रमाणात गर्दी पहावयास मिळाली बीड शहरासह जिल्ह्यात भीम मस्त मस्त भीम महोत्सव मोठ्या आनंदात साजरा करण्यात आला विश्वरत्न डॉ डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर चौक ते अण्णाभाऊ साठे चौक छत्रपती शिवाजी महाराज चौक कारंजा रोड तसेच इतर रोड पूर्णपणे गर्दीने भरगच्च भरली होती जयंती शांततेत पार पाडावी यासाठी पोलीस प्रशासनाच्या वतीने सुद्धा चोख बंदोबस्त तैनात करण्यात आला होता .जयंती मध्ये अनुचित प्रकार घडू नये शांततेत पार पाडावी यासाठी पोलीस अधीक्षक यांनी चोख बंदोबस्त लावला होता.



*बीड न्यायालय परिसर, वकील संघ उत्सव समितीकडून संविधान बंधुभाव मोटारसायकल रॅली काढण्यास आली.या अभिवादन रॅलीत देनशे वकील सहभागी झाले होते. वकील संघाचे अध्यक्ष ॲड. रोहिदास येवले, उत्सव समिती अध्यक्ष ॲड. विनायक जाधव, लॉयर फोरम अध्यक्ष ॲड. राहुल साळवे, ॲड. रईस पठाण, ॲड.मधुसूदन बाहेगव्हाणकर, ॲड.समीर पाटोदकर, ॲड. विलास जोशी उपस्थित होते. संचलन ॲड.सुरेश वडमारे यांनी केले.*

## भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त धनंजय मुंडे यांनी केले अभिवादन

● भीम जन्मोत्सवाच्या दिल्या शुभेच्छा, मोफत वही - पेन वाटपात घेतला सहभाग

**परळी । प्रतिनिधी**

वैद्यनाथ (दि. १४) – भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त माजी मंत्री तथा परळीचे आमदार धनंजय मुंडे यांनी सकाळी ११ वाजता परळी शहरातील रेल्वे स्थानक परिसरातल्या डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. धनंजय मुंडे यांनी यावेळी उपस्थित नागरिकांना भीम जन्मोत्सवाच्या शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयघोषाने परिसर दणाणून गेला होता.



▶▶ उर्वरित पान २ वर



*बीड : ईट येथील श्री. श्रेत्र गुगळादेवी यात्रे निमित्त संघर्ष योद्धा मनोज दादा जरांगे पाटिल यांची मिरवनुक काढण्यात आली या वेळी इट चे सरपंच गणपत डोईफोडे ,गोरख डोईफोडे दीपक जाधव, लक्ष्मण नरनाळे यांच्यासह इट येथील महिला व नागरिक मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.*

## बीडच्या जिल्हा रुग्णालयात सलग दुसऱ्या दिवशी मातेचा मृत्यू

**बीड । प्रतिनिधी**

पुण्यातील दीनानाथ मंगेशकर रुग्णालयात एका महिलेचा प्रसतुीदरम्यान मृत्यू झाला होता. उपचाराच्या दिरंगाईने आणि रुग्णालयाने उपचारासाठी २० लाख रुपये मागितले. वेळेत रक्कम न भरल्याने महिलेचा मृत्यू झाल्याचा दावा करण्यात येत होता. या घटनेने एकच खळबळ उडाली होती. त्यानंतर आता बीडच्या जिल्हा रुग्णालयात सलग दुसऱ्या दिवशी मातेचा मृत्यू झाल्याने जिल्हा रुग्णालयात




चाललंय काय? असा सवाल उपस्थित होतोय. आठवड्यातील ही तिसरी घटना आहे. रुक्मीन परशुराम टोने असे मयत मातेचे नाव आहे.

याबाबत मिळालेल्या माहितीनुसार, रूक्मीन परशुराम टोणे या १३ एप्रिल रोजी सकाळी १० वाजता जिल्हा रूग्णालयात ॲडमिट झाल्या होत्या. त्यानंतर लगेच सकाळी ११:४० वाजता त्यांचे सिझर झाले. त्यांनी २३०० ग्राम वजनाचा मुलाला जन्म दिला. ही त्यांची चौथी प्रसूती होती. त्यांच्यावर आयसीयू विभागात उपचार सुरू होते.

उपचार सुरू असतनाच मातेचा मृत्यू

१४ एप्रिल रोजी सकाळी साडे सहा वाजेच्या सुमारास त्यांचा उपचार सुरू असतनाच मृत्यू झाला. त्यांचे शवविच्छेदन जिल्हा रूग्णालयात करण्यात आले. रुक्मिणी यांना पूर्वीपासून हृदयाशी संबंधित आजार असल्याचं सांगण्यात आले आहे. तसेच रुग्णालयात दाखल झाल्यानंतर ▶▶ उर्वरित पान २ वर



# घटनाकार बाबासाहेब डॉ. भिमराव आंबेडकर जयंती

## लोकशाही बळकटीसाठी राष्ट्रहित प्रथम, तर व्यक्तिपूजा नकोच

भारतीय संविधानाचे शिल्पकार विश्वरत्न बाबासाहेब डॉ. भिमराव आंबेडकर यांचा उदय म्हणजे उपेक्षित, तेजोहिन अन् सामाजिक चेहरा नसलेल्या समाजघटकांमध्ये मानवी हक्कांबद्दल जागृतता निर्माण करणाऱ्या क्रांतीसूर्याचे उदयच म्हणावे.

जाती-पातीच्या विषमतेवर मनुवादी समाजव्यवस्थेतून शेकडो वर्षे गुलामगिरीचे जीवन जगणाऱ्या दलित-पददलित मागास लोकांना नवा सामाजिक चेहरा देण्याचं व त्यांना बोलकं करण्याचं ऐतिहासिक कार्य महानायक बाबासाहेब डॉ.आंबेडकर यांनी केलं.त्यातून तथाकथित समाजातली वर्णव्यवस्था व जातीभेदाचे समूळ उच्चाटन करत देशात सामाजिक समता प्रस्थापित केली. अशा युगपुरुष विश्वरत्न बाबासाहेब डॉ. भिमराव आंबेडकर यांना जयंती दिनानिमित्त सर्वधर्मीय भारतीयांची भावपूर्ण आदरांजली!

सामाजिक क्रांती घडवून आणणाऱ्या बाबासाहेबांचे स्थान आजही आधुनिक भारताच्या इतिहासात सह्याद्रीसारख अढळ आहे. अखिल मानवजातीला सामाजिक समतेचा संदेश देणारे महामानव बाबासाहेब डॉ. आंबेडकर यांचा १४ एप्रिल हा जयंती दिन कॅनडा सरकारने मागील वर्षी समता दिन म्हणून देशात साजरा करण्याचा निर्णय घेतला.याबद्दल आम्ही भारतीय कॅनडा सरकारचे आभार प्रकट करतो विश्वरत्न बाबासाहेब डॉ . भिमराव आंबेडकर हे केवळ भारतालाच नव्हे तर,साऱ्या जगताला हवे हवेसे वाटायचे.मागील काळात ऑक्सफर्ड विद्यापीठाने जगातील १०० महान विद्वानांची यादी तयार केली होती,त्यात बाबासाहेबांचे नाव अग्रभागी होते,ही गोष्ट भारतीयांच्या दृष्टीने मोठ्या अभिमानाची आहे.

दलित पददलित मागास समाजाचे नव्हे तर मानव तेचे कैवारी बाबासाहेब डॉ. भीमराव आंबेडकर यांचा जन्म १४ एप्रिल १८९१ रोजी मध्य प्रदेशातील महू येथे सुभेदार रामजी मालोजीराव आंबेडकर यांच्या कुटुंबात झाला अन् जणू ज्ञानाचं एक नवं विद्यापीठ नावरूपाला आलं.वंदनीय भीमाबाई ह्या बाबासाहेबांच्या मातोश्री, बाबासाहेब हे पाच वर्षाचे असतानाच त्या दिवंगत झाल्या.परिणामी बाबासाहेबांचं मातृछत्र बालपणीच विरून गेलं. पिताश्री सुभेदार रामजी हे लष्करात नोकरीला होते.इतकेच नव्हे तर,बाबासाहेबांचे आजोबा मालोजीराव हे देखील लष्करात होते.खरं तर,त्यांनी राष्ट्रसुरक्षेसाठी आपलं सारं जीवन समर्पित केलं.पुढे त्यांचेच सुपुत्र भीमराव उर्फ बाबासाहेब डॉ. आंबेडकर हे राज्यघटनेचे शिल्पकार बनून स्वतंत्र भारताचे भाग्यविधाता झाले. वास्तवात आंबेडकर कुटुंब हे रत्नागिरी जिल्ह्यातील दापोली जवळील आंबावडे गावचे मुळ रहिवाशी.दरम्यान वडिलांचे निधन झाल्यावर थोरले बंधू आनंदराव यांनी बाबासाहेबांच्या शिक्षणाची जबाबदारी स्वीकारली. विशेष म्हणजे बडोद्याचे महाराज सयाजीराव गायकवाड आणि कोल्हापूर संस्थानचे राजर्षी छत्रपती शाहू महाराज या द्वय महापुरुषांनी बाबासाहेबांना विदेशातील उच्च शिक्षणासाठी प्रोत्साहित करुन मोलाची मदत केली.त्यांनाही आमचा त्रिवार मानाचा मुजरा!

वंदनीय बाबासाहेब डॉ. आंबेडकर यांच्या अर्धांगिनी माता रमाई भिमराव आंबेडकर यांनी आपल्या जीवनाच्या अखेरपर्यंत त्यांना भक्कम साथ दिली.बाबासाहेबांच्या त्या खऱ्या अर्थाने सावलीच होत्या.संघर्षमय अन् स्वाभिमानी जीवन जगत अखेर त्यांनी जगाचा निरोप घेतला.दरम्यान बाबासाहेब आजारी पडले असता,ते हॉस्पिटलमध्ये दाखल असताना,तेथे त्यांची देखभाल करणाऱ्या डॉ.सविता कबीर यांच्याशी ओळख झाली अन् पुढे त्याचं रूपांतर सन १९४८ मध्ये विवाहात झालं.असा हा संमिश्र जीवन प्रवास युगपुरुष बाबासाहेब डॉ. आंबेडकर यांचा राहिला. ते स्वतः स्वाभिमानाने जगले अन् आपल्या अनुयायांनादेखील स्वाभिमानाने जगण्याची दीक्षा दिली.म्हणूनच त्यांना महामानव म्हणून संबोधिले जाते.

समाजातील गोरगरीब, उपेक्षित,दलित-पददलित, मागासवर्गीय प्रवर्गातील विभिन्न जाती-जमातीतील लोकांचा शैक्षणिक, सामाजिक व आर्थिक विकास साधण्यासाठी प्रथम आपल्याला उच्च शिक्षित व्हावे लागेल,हे जाणून बाबासाहेबांनी विभिन्न शास्त्रांचा सखोल अभ्यास करण्याचा दृढनिश्चय केला. अशाप्रकारे त्यांनी विद्वत्ता, कठोर परिश्रम,जिद्द,चिकाटी च्या बळावर शैक्षणिक क्षेत्रात उत्तुंग भरारी घेतली.केंब्रिज,ऑक्सफर्ड सारख्या जागतिक दर्जाच्या नामवंत विद्यापीठांमध्ये विविध सामाजिक शास्त्रांमध्ये एम.ए.(अर्थशास्त्र,राज्य शास्त्र,समाजशास्त्र) केलं.त्यानंतर त्यांनी दि प्रॉब्लेम ऑफ रुपी*



या प्रबंधातून पी.एचडी.संपादन केली.पुढे त्यांनी डी.लिट. (उस्मानिया विद्यापीठ),डी.एस्सी., एम.एससी.,एल.एल डी(कोलंबिया विद्यापीठ) व बॅरिस्टर आदी उच्चतम पदव्या आपल्या कठोर परिश्रम अन् बुद्धिमत्तेच्या जोरावर संपादन केल्या.त्यानंतर सिडनहॅम कॉलेजमध्ये काही काळ त्यांनी प्राध्यापकाची नोकरीही केली.ख्यातनाम अर्थशास्त्रज्ञ,थोर राजनितिज्ञ व समाजशास्त्रज्ञ,चतुरस्त्र संपादक-पत्रकार,लेखक, साहित्यिक,घटनातज्ज्ञ, खगोलशास्त्रज्ञ अशी बाबासाहेबांची बहुआयामी ओळख देशासह जगभरात आजही आहे.कारण त्यांनी भारतीय राज्यघटनेसह गतकाळात स्वतंत्र झालेल्या अनेक देशांना घटना तयार करताना नि:स्पृहपणे मोलाची मदत केली. म्हणूनच बाबासाहेब यांच्या कार्याचा ठसा जगभरात आहे.

शिक्षणाचा सर्वदूर प्रसार व्हावा,या उद्देशाने बाबासाहेबांनी औरंगाबाद येथे मिलिंद कॉलेज तर,मुंबईमध्ये पीपल्स एज्युकेशन सोसायटीच्या माध्यमातून सिद्धार्थ कॉलेज,लॉ कॉलेज,डॉ.बाबासाहेब आंबेडकर आर्ट्स,कॉमर्स महाविद्यालय सुरू केलीत. तसेच महाड,दापोली,पंढरपूर,नांदेड आदी ठिकाणी सुमारे २० हून अधिक शैक्षणिक संस्था स्थापन केल्यात. बाबासाहेबांनी गोरगरीब,गरजू,

आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक व मागास घटकांसाठी शैक्षणिक सोयी-सुविधा व शिष्यवृत्त्या जाहीर करून त्यांच्यासाठी शिक्षणाची कवाडं उघडी केली.महत्वाचे म्हणजे मागासवर्गीयांच्या सर्वांगीण उन्नतीसाठी त्यांनी शैक्षणिक संस्थांचे जणू जाळेच विणले.इतकेच नव्हे तर दलित-पददलित, मागासवर्गीय समाज बांधवांना शिका,संघटित व्हा व संघर्ष करा हा पथदर्शक संदेश दिला. मागासवर्गियांना राष्ट्राच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी बाबासाहेबांनी केंद्र व राज्य सरकारी नोकऱ्यांमध्ये त्यांच्याकरिता राज्यघटनेत आरक्षण व बढतीच्या तरतुदी केल्या.जेणेकरून शेकडो वर्षांपासून पिछाडीवर राहिलेला मागास समाज राष्ट्राच्या मुख्यप्रवाहात सामील होऊ शकेल.खरं तर,बाबासाहेब हे मागासवर्गीयांचे नव्हे तर संपूर्ण मानव जातीचे आधारवड होते.

शिक्षणतज्ञ बाबासाहेब डॉ. भिमराव आंबेडकर यांनी शिक्षणाच्या माध्यमातून मागास समाजातील निरक्षरता दूर करण्यावर आपलं सारं जीवन वेचलं.या पार्श्वभूमीवर मागासवर्गीयांना *शिकाल तर टिकाल* हा मोलाचा सल्ला दिला.गोरगरीब मागास घटकांच्या पाल्यांना अभ्यासाची व अन्य विषयांची पुस्तके सहजपणे उपलब्ध व्हावीत,या उद्देशाने बाबासाहेबांनी दादर येथील त्यांच्या राजगृह निवासस्थानी विविध विषयांची सुमारे ५०,००० पुस्तकांचे ग्रंथालय उभारले आहे. वास्तविक पहाता, बाबासाहेबांनी आपलं संपूर्ण आयुष्य समाजातील उपेक्षित घटकांच्या उत्थानासाठी व्यतित केलं.ते खऱ्या अर्थानं तमाम मागासवर्गीयांचे भाग्यविधाता होते.

उल्लेखनीय गोष्ट म्हणजे घटनाकार बाबासाहेब डॉ.आंबेडकर हे शेतकऱ्यांचे कैवारी होते.शेतकऱ्यांचे हित जपण्यासाठी त्यांनी पार्लमेंटमध्ये अनेकदा आवाज उठविला.त्यांच्या मते, भारतीय शेतकरी हा कर्जात जन्मतो,कर्जात जगतो अन् कर्जातच मरतो यासाठी व्यवहार्य मार्ग म्हणजे सामुदायिक शेतीचा प्रयोग करून जे उत्पादन येईल,त्यातील सरकारचा हिस्सा वगळून,उर्वरित उत्पादन शेतकऱ्यांना सम -समान पद्धतीने वाटप करावे,असा मोलाचा सल्ला बाबासाहेबांनी सरकारला दिला.कृषी मालावर प्रक्रिया करणाऱ्या उद्योग क्षेत्रावर भर दिला गेला पाहिजे. सरकारने कृषीपूरक उद्योग उभारले पाहिजेत,जेणेकरून शेतकऱ्यांची आर्थिक परिस्थिती सुधारेल.कृषी उत्पन्नावर कर लावू नये. शेतकऱ्यांविषयीचा सरकारचा दृष्टिकोन पारदर्शक व सकारात्मक असावा.त्यांचे सर्वांगीण हित जपणारा असावा. शेती हा सरकारी धंदा(व्यवसाय)म्हणून असावा,असे त्यांचे प्रामाणिक मत होते.कारण त्यामुळे नैसर्गिक आपत्तींमुळे होणाऱ्या आर्थिक नुकसानीची झळ थेट बळीराजाला पडू शकणार नाही. छोटे अल्पभूधारक,कोरडवाहू शेतकऱ्यांच्या ज्वलंत प्रश्नांवर बाबासाहेबांनी लोकसभेत परखड अन् रोखठोक मतं मांडली होती. सरकारने अन्नदाता शेतकऱ्यांचे कुठल्याही परिस्थितीत हित जपावे,हा त्यांचा नेहमी आग्रह असायचा.त्यांनी सदैव बळीराजाची पाठराखण केली,कारण ते शेतकऱ्यांचे भाग्यविधता होते.

केंद्रीय कायदा मंत्री असताना बाबासाहेबांनी स्त्री शिक्षण, स्त्री-पुरुष समानता अन् स्त्री स्वातंत्र्यावर अधिक भर दिला.तसेच महिलांच्या हितासाठी वीसहून अधिक कायदे केलेत.हिंदू मॅरेज क्टचे निर्माते खऱ्या अर्थानं बाबासाहेबच आहेत.कायद्याद्वारे वडिलांच्या संपत्तीत मुलीला लग्नानंतरही मुलाबरोबरीचा समान हक्क प्रदान केला.. तो बाबासाहेबांनीच.स्त्री शिकली तर,कुटुंबासह समाजाला शिक्षित करण्याची तिच्यात धमक असल्याचे बाबासाहेबांचे ठाम मत होते.महिलांना शिक्षणाच्या मुख्यप्रवाहात आणून आत्मनिर्भर बनविण्याचं अन् स्वाभिमानाचं जीवन जगण्याची सकल स्त्री जातीला त्यांनी दिशा दाखविली.परिणामी आज महिला सबलीकरण होऊन त्या पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून सर्वच क्षेत्रात आघाडी घेतांना दिसत आहेत.महिलांना राजकारणात पुरेसं अन् योग्य स्थान द्या,असा सल्लाही त्यांनी राज्यकर्त्यांना दिला.महिला ह्या देशाचा राज्यकारभार निष्ठापूर्वक,सक्षमपणे व कर्तव्यबुद्धीने करू शकतात,याचा त्यांना विश्वास होता.वास्तवात बाबासाहेब हे स्त्री स्वातंत्र्याचे पुरस्कर्ते होते.

स्वतंत्र देशाचा राज्यकारभार सनदशीर मार्गाने चालविण्यासाठी राज्यघटनेची आवश्यकता असते,हे जाणून घटना समितीचे अध्यक्ष डॉ.राजेंद्र प्रसाद यांनी बाबासाहेब डॉ.आंबेडकर यांना मसुदा समितीचे अध्यक्ष नेमून भारतीय संविधान तयार करण्याची जबाबदारी सोपविली.याशिवाय मसुदा समितीत काही तज्ज्ञ मान्यवरांची देखील सदस्य म्हणून नियुक्ती करण्यात आली.या समितीने विविध देशांचे दौरे केले. अन् तेथील राज्यघटनांचा सखोल अभ्यास करून त्यातील आपल्या देशास उपयुक्त असणाऱ्या तरतुदी संकलित केल्या. तब्बल २ वर्षे,११ महिने,१८ दिवस विविध देशांच्या राज्यघटनांचा अभ्यास केल्यावर देशांतर्गत दौरे करुन राज्यांमधील भौगोलिक परिस्थिती,संस्कृती,जीवन पद्धती,रीतिरिवाज,भाषा आदी बाबींचा सखोल अभ्यास करून अंतत: भारतीय संविधान नावरूपाला आले अन् २६ नोव्हेंबर १९४९ रोजी त्याला मान्यता मिळून,त्याद्वारे २६ जानेवारी १९५० पासून स्वतंत्र देशाचा राज्यकारभार सनदशीर मार्गाने हाकण्यास प्रारंभ झाला. त्या दिवसापासून भारतात सार्वभौम समाजवादी धर्मनिरपेक्ष लोकशाही गणराज्य म्हणून एका नव्या पर्वाला सुरुवात झाली.

भारतीय नागरिकांना व्यक्ती स्वातंत्र्य(जीवन जगण्याचे स्वातंत्र्य),विचार स्वातंत्र्य(अभिव्यक्ती स्वातंत्र्य),धार्मिक स्वातंत्र्य, उदरनिर्वाहासाठी व्यवसाय-नोकरी करण्याचे स्वातंत्र्य,न्यायालयात दाद मागण्याचे स्वातंत्र्य,शिक्षण स्वातंत्र्य हे मूलभूत अधिकार(हक्क) राज्यघटनेच्या माध्यमातून बहाल करण्यात आले.या हक्कांचा उपभोग घेताना प्रत्येक नागरिकाने इतरांच्या हक्कांची पायमल्ली होणार नाही,याची पुरेपूर खबरदारी घ्यावी,असं त्यांनी राज्यघटनेत प्रकर्षाने नमूद केलं.मूलभूत हक्कांसह राष्ट्राप्रती असलेल्या कर्तव्यांची जाणीवही घटनेच्या माध्यमातून नागरिकांना करून देण्यात आली.

लोकसभा,विधानसभा, स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये आपले पसंदीचे लोकप्रतिनिधी निवडून देण्यासाठी सर्वधर्मीय स्त्री- पुरुषांना मतदानाचा अधिकार देण्यात आला.याशिवाय वरील संवैधानिक संस्थांमध्ये विविध मागासवर्गीय प्रवर्गांसाठी लोकसंख्येच्या निकषांवर राखीव जागा ठेवण्यात आल्या. घटनाकार बाबासाहेब डॉ.आंबेडकर यांनी समाजातील आहे रे अन् नाही रे यातील दरी मिटवून सामाजिक समता प्रस्थापित करण्यावर अधिक भर दिला.वास्तविक पहाता, बाबासाहेबांनी आपलं सारं आयुष्य देशात स्वातंत्र्य, समता व बंधुता* प्रस्थापित करण्यासाठी पणाला लावलं.अत: बाबासाहेब हे सच्चे देशभक्त अन् सामाजिक समता प्रस्थापित करणारे महान समाजसुधारक होते,हे केवळ भारतानेच नव्हे तर,जगाने शिक्कामोर्तब केलं याचा आम्हा भारतीयांना सार्थ अभिमान आहे.

लोकशाहीत अभिव्यक्ती स्वातंत्र्यास अनन्यसाधारण महत्व असते. बाबासाहेब डॉ.आंबेडकर यांच्या पत्रकारितेला १९२० मध्ये प्रारंभ झाला.*पंखाशिवाय पक्षी जसा आकाशात भरारी मारू शकत नाही.त्याप्रमाणेच वृत्तपत्राशिवाय लोकशाहीला पूर्णत्व येऊ शकत नाही*.कारण लोकशाही राज्यपद्धती म्हणजे लोकांसाठी,लोकांनी निवडलेले,लोकांचे राज्य असते.लोकशाही राज्यपद्धतीत सत्ताधारी पक्षावर अंकुश ठेवण्याचे काम वृत्तपत्रे करत असतात.सरकारच्या प्रशासकीय निर्णयांमध्ये काही उणिवा असल्यास,वृत्तपत्रे त्याविरुद्ध वाचा फोडून सरकारला संबंधित निर्णय

लोकहितासाठी बदलण्यास बाध्य करतात.खरं तर, बाबासाहेबांनी पारतंत्र्याच्या काळात लोकजागृती व लोकशिक्षणासाठी आपल्या वृत्तपत्रांचा वापर केला. त्याप्रमाणेच मागास वर्गीय समाजघटकांना आपल्या मानवी अधिकारांची जाणीव व्हावी,त्यांना शिक्षणाचे महत्व कळावे अन् मागासवर्गीयांना आपल्या हक्कांसाठी लढण्याची ऊर्जा निर्माण करण्याचे अहमकार्य बाबासाहेबांनी आपल्या वृत्तपत्रांच्या माध्यमातून केलं.समाजातील दुर्लक्षित,उपेक्षित मागास वर्गीय घटकांचा आवाज बनून त्यांना बोलकं करण्यासाठी बाबासाहेबांनी मूकनायक,बहिष्कृत भारत,एकता,प्रबुद्ध भारत ही वृत्तपत्रे सुरू केली.त्याद्वारे बाबासाहेबांनी वंचित व उपेक्षित लोकांच्या ज्वलंत प्रश्नांना वाचा फोडली.याशिवाय मागास पददलितांना मानसिक,बौद्धिक व आर्थिक गुलामगिरीतून मुक्त करण्यासाठी त्यांनी वृत्तपत्र या आयुधचा अचूक प्रयोग केला.त्याची परिणती म्हणजे दलित,पददलित व मागासवर्गीयांमध्ये मानवी हक्कांची जाणीव निर्माण झाली.

बाबासाहेब हे संसदिय लोकशाही शासनप्रणालीचे पूजक होते. राज्यकर्त्यांना मार्गदर्शन करताना घटनाकार म्हणतात,सामाजिक व आर्थिक उद्दिष्टांची पूर्तता करण्यासाठी केवळ घटनात्मक मार्गांचाच वापर करावा.घटनेशी प्रामाणिक राहून स्वहितापेक्षा राष्ट्र हिताला प्राधान्य द्यावे.लोकशाही अधिकाधिक बळकट करण्यासाठी व्यक्तीपुजेला थारा न देता,राष्ट्र विकासाला प्राथम्य द्यावे.प्रजासत्ताक राज्याच्या निर्मितीसाठी राजकीय लोकशाहीला सामाजिक व आर्थिक लोकशाहीची जोड द्यावी.भारताचे सार्वभौमत्व,अखंडता व एकात्मता टिकवून ठेवण्यासाठी राज्यकर्त्यांनी सर्वंकष प्रयत्न करावेत.आपले राज्य धर्मनिरपेक्ष असल्याने प्रत्येकाने दुसऱ्याच्या धर्माचा आदर करावा.कुठल्याही घटनात्मक प्रमुखाने राज्यकारभार करताना विशिष्ठ धर्माला झुकते माप देऊ नये,तर सर्व धर्मांना समान लेखावे.राज्यकर्त्यांनी जाती-धर्माच्या नावावर भेदाभेद करू नये. राज्यघटना,राष्ट्रध्वज अन् राष्ट्रगीत यांचा राज्यकर्ते व सर्वधर्मीय नागरिकांनी सन्मान करावा.यातूनच भारतीय संसदिय लोकशाही ही जगात आदर्श राज्यप्रणाली ठरेल,हे निश्चित.

घटनाकार बाबासाहेब डॉ. आंबेडकर यांनी स्वतंत्र भारताचे संविधान तयार करून सामाजिक समता प्रस्थापित केली.याबद्दल सर्वधर्मीय लोक बाबासाहेबांचे सदैव ऋणाईत राहतील.परंतु भारताला स्वातंत्र्य मिळूनही जातीपाती-धर्माच्या नावावर दलित-पददलितांवर जो अन्याय झाला,

याबद्दल बाबासाहेबांना मनस्वी दुःख होत असे. नाशिकच्या काळाराम मंदिरात दलितांना प्रवेश नाकारणे,महाडचे चवदार तळे जे अनेक वर्षांपासून दलितांसाठी बंद होते,अमरावतीचे अंबादेवीचे मंदिर असो वा पुण्याचे पार्वती टेकडीवरील मंदिरात दलितांना प्रवेश बंदी ह्या अमानवीय घटनांमुळे बाबासाहेबांचे मन उद्विग्न झालं.या असामाजिक कृत्यांविरुद्ध त्यांनी जागोजागी तीव्र जनआंदोलने करून अखेर दलितांना या स्थळांमध्ये प्रवेश मिळवून दिला.दरम्यान आंबेडकरांनी आपल्या पाच लाख अनुयायींसह नागपूर येथे १४ ऑक्टोबर १९५६ रोजी धर्मांतर करून बौद्ध धर्म स्वीकारला.बाबासाहेब हे मानवतावादी विचारांचे युगपुरुष होते.या पार्श्वभूमीवर केंद्र व राज्य सरकारने सामंजस्याच्या भूमिकेतून दादरमधील इंदू मिलच्या प्रांगणात बाबासाहेब डॉ.आंबेडकरांचे स्मारक उभारलं जात आहे.खरं तर,हीच खरी युगपुरुष बाबासाहेब डॉ. भिमराव आंबेडकर यांना आदरांजली ठरेल.

पान १/४ वरून पुढे...

### भारतरत्न डॉ. बाबासाहेब...

डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर पुतळ्याच्या बाजूस आंबेडकरी अनुयायांच्या वतीने चिमुकल्या विद्यार्थ्यांना मोफत वही व पेन वाटप उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते, या उपक्रमातही धनंजय मुंडे यांनी सहभाग घेऊन आपल्या हाताने विद्यार्थ्यांना वही व पेन वाटप केले.

यावेळी युवक नेते अजय मुंडे, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे तालुकाध्यक्ष वैजनाथ सोळंके, रवींद्र परदेशी, डॉ. विनोद जगतकर, अभय मुंडे, इंटकचे दत्तात्रय गुट्टे, अनंत इंगळे, रवी मुळे, अमर रोडे, भीमराव डावरे, नगरपरिषदेचे मुख्याधिकारी त्रिंबक कांबळे, सय्यद सिराज, लक्ष्मण मुरकुटे, महेंद्र रोडे, गणेश मुंडे यांसह पदाधिकारी व असंख्य अनुयायी उपस्थित होते.

### बीडच्या जिल्हा रुग्णालयात...

त्यांना रेफरचा सल्लाही देण्यात आला होता. परंतु ते गेले नाहीत. मात्र सलग दुसऱ्या दिवशी एका मातेचा मृत्यू झाल्याने जिल्हा रुग्णालयात चाललंय काय? असा सवाल उपस्थित केला जात आहे.

रविवारीही मातेचा मृत्यू - दरम्यान, रविवारी बीड जिल्हा रुग्णालयात प्रसूती दरम्यान मातेचा मृत्यू झाल्याचा प्रकार उघडकीस आला. छाया

पान १/४ वरून पुढे...

गणेश पांचाळ असे मयत महिलेचे नाव आहे. डॉक्टरांच्या हलगर्जीपणामुळे मृत्यू झाल्याचा आरोप नातेवाईकांनी केला. तर प्रसूती व्यवस्थित करण्यासाठी २ हजारांची मागणी करण्यात आली, असा गंभीर आरोप मयतांच्या नातेवाईकांनी केला. रक्तस्त्राव होत असताना तिथल्या कर्मचाऱ्याला महिला कर्मचाऱ्याला उपचार करा, असे सांगितलं असता आम्ही सर्वजण निघून जातो, तुम्हीच तुमच्या पेशंटवर उपचार करा, असे उत्तर तेथील डॉक्टरांनी दिल्याचे मयताच्या आईने म्हटले आहे. तर मृत महिलेचे पती गणेश पांचाळ यांनी माझ्या बायकोची प्रसुती नॉर्मल झाली. त्यानंतर रक्तस्त्राव सुरू झाला. कर्तव्यावर असलेल्या डॉक्टर आणि नर्स यांनी वेळेवर उपचार केले नाहीत. तसेच रक्ताची पिशवी आणायला उशिरा सांगितले, असा आरोप केला आहे.

### अनिल राधे मित्र...

संतोष कांबळे, विठ्ठल कांबळे, सुरज कांबळे, युवराज कांबळे, आदित्य वाघमारे, विलास लोंढे, मयूर कांबळे, दत्ता कांबळे, विक्रम कांबळे, श्याम कांबळे, संकेत कांबळे, अविनाश कांबळे, प्रशांत कांबळे, प्रदीप कांबळे, बाळू कांबळे, अरविंद लोखंडे, नागेश कांबळे, आदेश वावळे, सागर कांबळे यांनी परिश्रम घेतले.

पान १/४ वरून पुढे...

### भारतरत्न डॉ. बाबासाहेब...

मनुवादी व्यवस्थेला उलथून, समता, बंधुता आणि न्याय असणारी लोकशाही या देशाला बहाल केली. त्याच्यामुळे राज्यातील जाती पातीचे आणि धर्मा धर्मात तेड निर्माण करणारी व्यवस्था उलथुन टाकण्यासाठी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची चळवळ आत्ता खऱ्या अर्थाने गतिमान करणायची गरज असल्याचे मत प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकाद्वारे भारतीय काँग्रेसचे नेते दत्ता कांबळे यांनी व्यक्त करत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची चळवळ गतिमान करणायचे आवाहन समाजाला उद्देशून केले आहे. यावेळी माणसाच्या जिवंनात क्रांती घडून अण्णाऱ्या महारुषांचा घोषणानी जयघोष कारण्यात आला.

यावेळी ब्रम्हगाव येथील मानवी हक्क अभियानचे तालुकाध्यक्ष मधुकर कांबळे,सरपंच नारायण भले, उपसरपंच अनिल कांबळे, माजी उपसरपंच प्रल्हाद तात्या कांबळे, ग्रा. पं. सदस्य लखन कांबळे,माजी सरपंच भगवान गायकवाड,जि. प. शाळेचे मुख्याध्यापक मुरलीधर गवळी सर,माजी सरपंच रामेश्वर शेंडगे, डोंगरे सर,ग्रा. पं. सदस्य श्रीमंत बादाडे,पद्माकर कांबळे, अर्जुन मुंडे, भागवत शेंडगे,कृष्णा शिंदे, धुराजी कांबळे, लखन कांबळे,मुकुंद हिवाळे,मोहन कांबळे, ग्रामपंचायतचे सेवक दशरथ कांबळे,कचरू कांबळे, बंडू साबळे, कमलेश कांबळे सह गावकरी मोठ्या

पान १/४ वरून पुढे...

संख्येने उपस्थित होते.

### महात्मा फुले, डॉ बाबासाहेब...

कालावधीत नागरिकांना शुद्ध पाणी मोफत मिळणार आहे.दैनंदिन व्यवस्थापन श्री शरद गालफाडे करणार आहेत. लोकार्पण कार्यक्रमास , केजपोलीस ठाण्याचे पोनि वैभव पाटील,आगार प्रमुख श्री चौरे ,गटशिक्षणाधिकारी लक्ष्मण बेडसकर, डॉ हनुमंत सौदागर,शिक्षणविस्तार अधिकारी सुनील केंद्रे,दत्ता चाटे,जयपाल मस्के,जयदीप देशमुख, नितीन देशमुख,अश्रूबा सोनवणे,भारत हांगे, अक्षर सेवाभावी संस्थेचे अध्यक्ष विष्णू यादव, जी बी गदळे,किशोर भालेराव,विक्रम डोईफोडे, ,युवराज हिरवे ,महादेव ढाकणे, अमोल बोबडे सुंदर डोईफोडे श्री अहंकारे, आदींची उपस्थिती होती. ए एम के डेव्हलपर्स यांच्याकडून पानपोळीसाठी एक महिन्याचा खर्च उचलण्याची जबाबदारी त्यांनी घेतली आहे केज पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक पाटील यांनी बोलताना डॉ बाबासाहेबांचा जयंतीनिमित्त स्तुत्य उपक्रमाचे कौतुक करून अभिनंदन केले. माणुसकी जपणारा हा विचार असल्याचे मत व्यक्त केले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी अक्षर संस्था व शिक्षक मित्रपरिवार यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमास नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन विक्रम डोईफोडे यांनी केले आभार डॉ हनुमंत सौदागर यांनी मानले.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड - ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड - ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक - दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

# आ. धनंजय मुंडे यांनी केली वैद्यनाथ तीर्थक्षेत्र विकास आराखड्याच्या कामांची पाहणी

## मंदिर व परिसरातील वास्तूंचे पुरातन महत्त्व जपून दर्जेदार पद्धतीने वेळेत कामे पूर्ण करण्याच्या सूचना



**परळी ।** प्रतिनिधी

बारा ज्योतिर्लिंगांपैकी पाचवे ज्योतिर्लिंग असलेल्या परळीतील प्रभू वैद्यनाथ मंदिर व परिसराच्या विकासासाठी वैद्यनाथ तीर्थक्षेत्र विकास आराखड्यातून मंजूर असलेल्या २८६ कोटी रुपयांतून सुरू असलेल्या विविध कामांची माजी मंत्री तथा परळीचे आमदार धनंजय मुंडे यांनी आज अधिकाऱ्यांच्या तसेच कंत्राटदारांच्या समवेत पाहणी केली.

मंदिर परिसरात भव्यदर्शन मंडपाचे काम सुरू असून आता चौथ्या मजल्याचेही काम पूर्ण झाले आहे. त्या ठिकाणी ग्लास री-इन-फोर्सड काँक्रीट पद्धतीने काम पूर्ण करावे, दगडी पायऱ्यांचे काम तसेच परिसरातील अन्य वस्तूंच्या कामाच्या संदर्भात पुरातन महत्व जपून तसेच दर्जेदार पद्धतीने काम पूर्ण केले जावे अशा सूचना यावेळी धनंजय मुंडे यांनी संबंधित कंत्राटदार तसेच अधिकाऱ्यांना केल्या आहेत.

वैद्यनाथ तीर्थक्षेत्र विकास आराखड्यासाठी २८६.६८ कोटी रुपयांचा आराखडा मंजूर करण्यात आलेला असून यातून आतापर्यंत एका भव्य अशा भक्त निवासाचे काम जवळपास पूर्ण झाले आहे. प्रदक्षिणामार्गाचे काम देखील अंतिम टप्प्यात असून, भव्य असे प्रवेशद्वार दगडी पायऱ्या दर्शन मंडप अशी कामे सध्या सुरू आहेत. मंदिर परिसरातील वास्तूंचे पुरातन महत्व जपण्याबरोबरच दर्जेदार पद्धतीने व निर्धारित वेळेत काम पूर्ण करावेत अशा सूचना धनंजय मुंडे यांनी यावेळी संबंधितांना केल्या. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे तालुकाध्यक्ष वैजनाथ सोळंके, तहसीलदार व्यंकटेश मुंडे, नगर परिषदेचे मुख्याधिकारी त्रिंबक कांबळे, राजा खान, जाफर खान, आर्किटेक्ट श्री बांगड, शिल्पकार गनीभाई यांसह अधिकारी - कर्मचारी आदी उपस्थित होते.

# लिंबागणेश येथे भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती साजरी

## सार्वजनिक उत्सव समिती अध्यक्षपदी शंकर निर्मळ तर उपाध्यक्षपदी अमोल निर्मळ यांची निवड

**लिंबागणेश ।** प्रतिनिधी

बीड तालुक्यातील लिंबागणेश येथे आज दि.१४ एप्रिल सोमवार रोजी राज्य घटनेचे शिल्पकार महामानव भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची १३४ वी जयंती ग्रामपंचायत कार्यालयात डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करत श्रीफळ फोडून उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सरपंच बालासाहेब जाधव होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक भिम टायगर ग्रुपचे जिल्हाध्यक्ष रविंद्र निर्मळ यांनी केले तर सुत्रसंचलन डॉ.बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव समिती अध्यक्ष शंकर निर्मळ यांनी केले. आभारप्रदर्शन उपाध्यक्ष अमोल निर्मळ यांनी केले. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी स्वातंत्र्य,समता, बंधुता व न्यायावर आधारीत समाज व्यवस्था निर्माण करण्यासाठी शिका, संघटीत व्हा, संघर्ष करा हा मुलमंत्र देऊन देशातील उपेक्षित समुहातील बांधवांना आपल्या हक्क व अधिकारासाठी आवाज उठवण्याची व लढा उभारण्याची ताकद निर्माण करून देण्याचे काम डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी केल्याचे प्रतिपादन भिम टायगर



ग्रुप बीड जिल्हाध्यक्ष रविंद्र निर्मळ यांनी केले. प्रा.लेनाजी गायकवाड यांनी आदर्श डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती साजरी करण्यात यावी हे कविता सादर केली.यावेळी राजाभाऊ गिरे, श्रीहरी निर्मळ ,बाळकृष्ण थोरात, दामोदर थोरात,रमेश गायकवाड, सुरेश निर्मळ,अँड.गणेश वाणी, रामदास मुळे,दादा गायकवाड, संतोष भोसले आदी सहभागी होते. यावेळी डॉ.बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव समितीच्या पदाधिकाऱ्यांची निवड करण्यात आली असुन अध्यक्षपदी शंकर ऊर्फ रिंकु निर्मळ यांची तर उपाध्यक्षपदी अमोल निर्मळ यांची निवड करण्यात आली.सचिवपदी स्वप्निल वक्ते,कोषाध्यक्ष पदी स्वप्निल निर्मळ, सभासद म्हणून सुमेध निर्मळ, स्वप्निल निर्मळ,सौरभ निर्मळ, प्रकाश निर्मळ, तुळशीराम पवार, तुकाराम गायकवाड यांची आरूण निर्मळ,जितु निर्मळ, ज्ञानोबा निर्मळ,पोपट निर्मळ बन्सी निर्मळ यांच्या मार्गदर्शनाखाली पदाधिकारी निवडी करण्यात आल्या.



*लोकनेते सुंदररावजी सोळंके सहकारी साखर कारखाना लि सुंदरनगर तेलगाव कारखाना कार्यालयात भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी करण्यात आली.प्रतिमेस विनम्र अभिवादन करताना सचिव सुरेश लगड, कर्मचारी संघटना उपाध्यक्ष दत्ता सोळंके, अशोक पाटील,दासराव मोरे,अजय लगड, राहुल सावंत, अशोक तिडके, उल्हास मुजमुले, अर्जुन गालफाडे आदी*

# शेतकऱ्यांना पाणी मिळावे यासाठी अनेक कठोर निर्णय घेतले

## कशाचीही पर्वा केली नाही; आमदारकीच्या सुरुवातीसच ३६ कोटी रू.चा गाळ काढला

**आष्टी ।** प्रतिनिधी

आपण शेतकऱ्यांचे प्रतिनिधी असून शेतकऱ्यांच्या हिताचे निर्णय घेण्यासाठी अनेक कठोर निर्णय घेतले सन २००२/०३ मध्ये केंद्र शासनाच्या योजनेतून ३६ कोटी रु. किमतीच्या गाळ काढण्याची योजना आपण तालुक्यात राबवली.. तेव्हापासून या योजनेचे महत्त्व तालुक्यातील शेतकऱ्यांना समजले आहे.. शेतकऱ्यांना आता फक्त आर्थिक मदतीची आवश्यकता असून बँकांनी या गाळ काढण्याच्या योजनेसाठी शेतकऱ्यांना कर्ज दिले पाहिजे अशी आपली ठाम आग्रही मागणी असून बीड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँके ऐवजी आता आष्टी पाटोदा आणि शिरूर हे तालुके आर्थिक व्यवहारासाठी अहिल्यानगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेला जोडण्याचा आपला प्रयत्न असून याबाबत मंत्री विखे



पाटील साहेब आणि अहमदनगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे अध्यक्ष आमदार शिवाजीराव कर्डिले यांच्याशी प्राथमिक चर्चा झाली आहे असे सांगत आष्टी तालुक्यातील चार प्रकल्पांमधील गाळ करण्यासाठी नियुक्त करण्यात आलेल्या अशासकीय संस्था नाम फाउंडेशन चे संचालक नाना पाटेकर आणि मकरंद अनासपुरे आणि टाटा मोटर्स यांचे यांचे आभार व्यक्त केले. या पूर्वी शेतकऱ्यांच्या हितासाठी आपण कोणत्याही टोकाला जाऊन निर्णय घेतले असून अगोदर निर्णय घेऊन मग जनतेला समजून सांगण्याचे काम केले आहे असे प्रतिपादन आ.सुरेश धस यांनी केले.. गाळमुक्त धरण आणि गाळ युक्त शेत या योजनेअंतर्गत तालुक्यातील..मेहेकरी मध्यम प्रकल्प, रूटी मध्यम प्रकल्प, कडा मध्यम प्रकल्प,आणि कडी मध्यम प्रकल्प,या चार मध्यम प्रकल्पातील गाळ काढण्याचे करण्यासाठी नाम फाउंडेशन पुणे आणि टाटा मोटर्स यांची नियुक्ती करण्यात आली आहे त्यापैकी रूटी मध्यम प्रकल्पातील गाळ काढण्याच्या शुभारंभ प्रसंगी ते बोलत होते यावेळी केशव आघाव साहेब,नाम फाउंडेशन मराठवाडा विभागाचे राजाभाऊ शेळके उप अभियंता पाखरे, सहाय्यक अभियंता श्रेणी २ सोळंके मॅडम, दुधसंघ चेअरमन शांतीलाल भोसले,कृषी उत्पन्न बाजार समिती पाटोदा सभापती किरण शिंदे, माजी नगराध्यक्ष रंगनाथ धोंडे,मेश्राम मॅडम मंडळ अधिकारी सोनाली कदम,बाबासाहेब भोसले आदी मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते.

प्रसिद्ध अभिनेते नाना पाटेकर आणि मकरंद अनासपुरे हे मातीशी नाळ असलेले अभिनेते असून त्यांच्याकडून हे समाजाभिमुख असलेले काम होत आहे या कामासाठी मन मोठे असावे लागते दानत असावी लागते ती दानत आणि मोठे मन या दोन व्यक्तींकडे असल्याचे सांगून त्यांनी त्यांचे आणि राजाभाऊ शेळके, आणि केशव आघाव ,टाटा मोटर्स यांचे आभार व्यक्त केले. यावेळी या भागातील गणेश शिंदे, अशोक मुळे, अजित घुले, दिंडे, खेमगर, पोपट गोंडे, खंडू जाधव, नवनाथ चखाले, भाऊसाहेब निंबाळकर,अंकुश आवारे, राधाकिसन पोकळे, गंगाधर पडोळे, खंडू तोडकर, संतोष मुरकुटे, गंगा गोल्हार, भगवान शिनगारे, बाळासाहेब बोराडे, अजित मुळे, सचिन लोखंडे, राम योगे, संतोष रणसिंग, अतुल कोठुळे, महादेव कोंडे, मनोज धनवडे, इर्शान खान, जुनेद शेख, आशिष अग्रवाल, कपिल अग्रवाल, रावसाहेब मुटकुळे, भगवान शिंनगिरे यांच्यासह मोठ्या प्रमाणावर शेतकरी उपस्थित होते.

# माझाच काय कोणाचाच वाढदिवस साजरा करू नका

## अँड. अजित देशमुख यांचा वाढदिवसानिमित्ताने कार्यकर्त्यांना संदेश

मित्रांनो, नमस्कार, आज १५ एप्रिल, माझा वाढदिवस. पण आपल्याला तो साजरा करायचा नाही.

जिल्ह्यात वाढलेली अनागोंदी, समाज विघातक कृत्य आणि शासनाच्या भोंगळ कारभारामुळे कोट्यावधींच्या बंद पडलेल्या योजना. या सर्वांचा निषेध नोंदवत मी वाढदिवसानिमित्त कोणताही हार-तुरा, पुस्तक, पेन वगैरे न स्विकारण्याचा निर्णय मी घेतला आहे.

जन आंदोलनाच्या माध्यमातून आमचे देखील हजारो कार्यकर्ते आहेत. जे आपसात समन्वयाने राहतात. तसं पाहिलं तर सामाजिक कार्यकर्त्यांनी वाढदिवस साजराच करू नये, या मताचा मी आहे. आजपर्यंत मी वाढदिवस साजरा करीत नाही. मात्र सोशल मीडियामुळे कार्यकर्त्यांना वाढदिवसाची माहिती मिळते. आणि त्यातून वाढदिवस साजरा केल्याचा प्रकार पुढे येतो.

सामाजिक काम करताना, जोडले गेलेले हजारो कार्यकर्ते, हे सामान्य परिस्थितीचे असतात. अशा कार्यकर्त्यांचा हार-तुरा, पुस्तक, पेन वगैरेचा खर्च सुद्धा होऊ नये, या मताचा मी आहे. यातून साध्य तर काहीच होत नाही. मात्र कार्यकर्त्यांचा वेळ आणि पैसा वाया जातो. त्यामुळे वाढदिवसाच्या या प्रथा कुठेतरी थांबल्या पाहिजेत. फोन करून अथवा मेसेज टाकून सदिच्छा दिल्या, तरी त्या कार्यकर्त्यांपर्यंत पोहोचतात.

त्यामुळे वाढदिवस हा खर्चिक ठरू नये, या मताचाही मी आहे. सामाजिक कार्यकर्ते हे केवळ समाज हिताच्या कामाच्या उद्देशाने एकत्र आलेले असतात. त्यांना परस्परांपासून कुठल्याही स्वार्थ नसतो. त्यामुळे अशा अपेक्षा ठेवणे देखील चुकीचे असते.

जिल्ह्यात जलजीवन योजना असेल अथवा अन्य कोणत्याही योजना. त्या सध्या ७० ते ८०% च्या वर बंद पडलेल्या आहेत. कामावर काही लाख, कोटींचा खर्च झालेला आहे. मात्र पुढचा पैसा मिळत नसल्यामुळे कामे बंद आहेत, हे जनतेचे नुकसान आहे. त्याचप्रमाणे कधी नव्हे एवढी अराजकता जिल्ह्यात माजली आहे. सर्वसामान्य या गोष्टीचा तीव्र निषेध करतात.



मात्र राजकारणातली गुंडागिरी. भ्रष्टाचार आणि अन्य कारणांमुळे सामान्य जनता त्रस्त झालेली आहे. जिल्ह्यातील हे वातावरण गढूळ होण्यास जे कारणीभूत आहेत, त्यांना अजूनही याचे काही देणे घेणे आहे, असे वाटत नाही.

शासनाच्या विचारपूर्वक न घेतलेल्या निर्णयामुळे शासनाकडे निधी उपलब्ध राहिलेला नाही. म्हणून कित्येक योजना बारगळल्या आहेत. त्याचप्रमाणे नवीन योजनांना पैसा देण्यासाठी शासनाकडे पैसा देखील नाही. शासन आता किती हजार कोटींचं कर्ज जनतेच्या डोक्यावर ठेवणार ? हे कळत नाही.

कुचकामी धोरणे आणि वाढता भ्रष्टाचार या सर्वाला कारणीभूत आहे. यावर सामान्य जनतेमध्ये विचार मंथन होणे गरजेचे आहे. मात्र सामान्य जनतेला तेवढा वेळ नसल्याने विचारमंथन होत नाही. आणि म्हणून शासन स्तरावर काम करणाऱ्या अधिकारी आणि कर्मचारी, त्याचबरोबर सर्व स्तरातील लोकप्रतिनिधी यांना जनता जाब विचारू शकत नाही. या सर्व बाबी निषेध नोंदवने योग्य आहे. सरकार कोणाचेही असो, ते व्यवस्थित चालले पाहिजे. जिल्ह्यात राजकारणी कोणीही असो, राज्यातील राजकारणी कोणीही असो, ते देखील व्यवस्थित चालले पाहिजेत. त्याचप्रमाणे जनतेची कामे रेंगळली तर जनतेचे नुकसान होते. त्यामुळे प्रशासन गतिमान असायला हवे.

मात्र प्रशासनाने जनतेच्या कामाऐवजी दुसरीकडेच गती घेतल्याचे अनेक वेळेला स्पष्ट झालेले आहे. या सर्व बाबींचा निषेध नोंदवत मी यावर्षी वाढदिवस साजरा न करण्याचा निर्णय घेतलेला आहे. त्यामुळे कार्यकर्ता बंधूंना वाढदिवसासाठी पुस्तक, पेन वगैरे आणू नये, देऊ नये, अशी विनम्र विनंती करतो.

वास्तविक पाहता कोणाच्याही वाढदिवसाला खर्च करण्याचे जनतेने टाळले पाहिजे. कारण त्यातून काहीही साध्य होत नाही. हार तुरे माणूस पुढे गेला की, बाहेर टाकून द्यावे लागतात. मग अशा भेट वस्तूंसाठी खर्च का करायचा ? याचा देखील जनतेने विचार करावा, असे आवाहन देखील मी या निमित्ताने करीत आहे. सर्व दृष्टीने आणि सर्व स्तरातील विचार मंथनानंतर हे लिहिले आहे. याबाबत कोणालाही राग लोभ नसावा. आपल्या शुभेच्छा आणि सदिच्छा पाठीशी आहेत त्या राहतील. या सदिच्छा आणि शुभेच्छांच्या जीवावरच मी आजपर्यंत समाजकार्य करत आलेलो आहे. एक सामान्य कार्यकर्ता म्हणून हे कार्य माझ्या हातून शेवटपर्यंत चालू राहील. याचीही मी ग्वाही देतो आणि थांबतो. धन्यवाद.

CMYK

दैनिक
● epaper.marathwadapatra.com
# मराठवाडा पत्र

मंगळवार, दि.१५ एप्रील २०२५ पान ४

## भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी घालून दिलेल्या नवी दिशा देणाऱ्या आदर्शाची खरी गरज आज राष्ट्राला आहे : राजकिशोर मोदी

# भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची 134 वी जयंती उत्साहात संपन्न




**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

भारतरत्न, बोधिसत्व डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची १३४वी जयंती आज संपूर्ण देशविदेशात मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. अंबाजोगाई शहरात देखील माजी नगराध्यक्ष राजकिशोर मोदी व त्यांच्या सहकाऱ्यांनी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी केली. शहरातील डॉ बाबासाहेब आंबेडकर चौक येथे परमपूज्य , बोधिसत्व भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून त्यांना अभिवादन केले. यावेळी त्यांनी राष्टाला आज खऱ्या अर्थाने बाबासाहेबानी घालून दिलेल्या आदर्शाची खरी गरज असल्याचे परखड भावना व्यक्त केली. यावेळी राजकिशोर मोदी यांच्या समवेत मनोज लखेरा, म हादेव आदमाणे ,चंद्रशेखर वडमारे ,डॉ राजेश इंगोले, पंडित हुलगुंडे, धम्मा सरवदे, अमोल लोमटे, राजू मोरे, सुनील वाघाळकर, बबन पानकोळी, माणिक वडवनकर , सुभाष पानकोळी, सुधाकर टेकाळे, सय्यद रशीद, गोविंद पोतंगले, अंकुश हेडे, मतीनं जरगर, राम घोडके, जावेद गवळी, अकबर पठाण, शाकेर काझी, दत्ता सरवदे, खलील जाफरी, रफीक गवळी, आकाश कऱ्हाड, अजीम जरगर, विशाल पोटभरे, शरद काळे, अस्लम शेख, संतोष चिमणे, सुगत सरवदे, सुमित सुरवसे, रोशन लाड, अनिस पठाण, यांच्यासह अनेक सहकारी सहभागी झाले होते.



*भारतीय संविधानाचे शिल्पकार महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त माजी शिवसेना जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते सर यांनी बीड शहरातील त्यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले व उपस्थित सर्व भिमसैनिकांना जयंतीनिमित्त शुभेच्छा दिल्या. यावेळी रिपाई चे तालुका अध्यक्ष किशनजी तांगडे, रासप चे जिल्हाध्यक्ष आण्णासाहेबजी मतकर,तालुका उपाध्यक्ष भाऊसाहेबजी कांबळे, युवा नेते दिपक घोडके पाटील,राम वडमारे सह सर्व भिमसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.*

## अनिल राधे मित्र मंडळाच्या रक्तदान शिबिरास प्रतिसाद - डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्त उपक्रम

**माजलगाव । प्रतिनिधी**

येथील अनिल राधे कांबळे मित्र मंडळाच्या वतीने महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त दि. १४ एप्रिल रोजी रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या रक्तदान शिबिरास रक्तदात्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.



या रक्तदान शिबिराचे उद्घाटन मोहन जगताप यांच्या हस्ते करण्यात आले. अध्यक्षस्थानी नितीन नाईकनवरे हे होते. यावेळी जयसिंग सोळंके, सभापती जयदत्त नरवडे, राजेश घोडे, संतोष यादव, भास्कर शिंदे, धम्मानंद साळवे, अमोल शेरकर, दत्ता कांबळे, विठ्ठल तुपसौंदर, शिवसेना तालुकाप्रमुख तुकाराम येवले, भाजपा तालुकाध्यक्ष अरुण राऊत, शरद यादव, पापा सोळंके, शरद यादव, प्रल्हाद दळवी, कचरू कांबळे, बबन खंडागळे, सरपंच नारायण भले यांचे सह भिमभक्त उपस्थित होते. रक्तदान शिबिरासाठी दशरथ कांबळे, बाबासाहेब कांबळे, भानुदास कांबळे, ▶▶ उर्वरित पान २ वर

## भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्त अभिवादन कार्यक्रम संपन्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची चळवळ गतिमान करण्याची गरज : दत्ता कांबळे

**माजलगाव । प्रतिनिधी**

शहरालगत असणाऱ्या पुनर्वसित ब्रम्हगाव येथे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्त ब्रह्मगाव येथील लोकशाहीर अण्णाभाऊ साठे चौकात निळ्या ध्वजाचे ध्वजारहन भारतीय काँग्रेसचे नेते दत्ता कांबळे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी ध्वजारोहन व अभिवादन



कार्यक्रमाचे आयोजण अंजन कांबळे, कृष्णा शिंदे, नागेश कांबळे यांनी केले होते.

समाजातील अस्पृश्य, शोषित, पिडीत, वंचित आणि समाजातील अतिशय शेवटच्या घटकाला न्याय मिळून देण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल आयुष्य खर्ची केलं. इथल्या ▶▶ उर्वरित पान २ वर

## केज बसस्थानकात अक्षर सेवाभावी संस्था व शिक्षक मित्रपरिवाराकडून पाणपोई चे लोकार्पण

# महात्मा फुले, डॉ बाबासाहेब आंबेडकर जयंती दिनी सामाजिक उपक्रम

**केज । प्रतिनिधी**

केज बसस्थानकात अक्षर बहुउद्देशीय सेवाभावी संस्था व शिक्षक मित्रपरिवार यांच्या संयुक्त विद्यमाने क्रांतीसूर्य महात्मा फुले जयंती व भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर संयुक्त जयंती उत्सव दिनी मोफत पाणपोईचे लोकार्पण करण्यात आले.

डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी बहुजनांसाठी सत्याग्रह केला. तोच वारसा घेऊन आज भर उन्हाळ्यातली गरज ओळखून



पाणपोई ची सुरुवात करण्यात आली. एप्रिल ते जून या ▶▶ उर्वरित पान २ वर






*बीड : भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त शहरातील पुतळ्यास राष्ट्रवादी काँग्रेसचे युवा नेते डॉ.योगेश क्षीरसागर यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी युवा नेते हेमंत क्षीरसागर यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.*



*बीड: भारतीय संविधानाचे शिल्पकार महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंती निमित्ताने त्यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून, अभिवादन करताना युवा रिपाइं प्रदेशाध्यक्ष पप्पू कागदे, माजी आ.जनार्धन तुपे, सुशीलाताई मोराळे, अशोक हिंगे, राजू जोगदंड,बबन वडमारे, अजय सवाई आदी.*



*विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांच्या संयुक्तिक जन्मोत्सवा निमित्त ''तुलसी'' शैक्षणिक संस्थेचे संस्थापक अध्यक्ष श्री प्रा रोडे सर यांनी आयोजित केलेल्या स्नेह भोजन व अभिवादन कार्यक्रमास राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांनी उपस्थित राहून दोन्ही महामानवांना अभिवादन केले.*



*बीड: डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन करताना बीड येथील महिला वकील संघ.*



*भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, महामानव, भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंती निमित्त बीड शहरातील पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करताना नगरसेवक शुभम धूत .*